19 JUN 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ४१० गुणवंत विद्यार्थ्यांना विद्यापीठाची २९.५५ लाखांची शिष्यवृत्ती

## सर्वाधिक शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या महाविद्यालयांचा गौरव : योजनेसाठी विद्यार्थी पात्र ४१० : विद्यार्थिनींची संख्या ३५६

**जनप्रवास : कोल्हापूर**

शैक्षणिक गुणवत्ता आणि स्पर्धात्मकता वाढविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या 'शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती' योजनेअंतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी एकूण ४१० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून त्यांना २९ लाख ५५ हजार रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. यामधील सर्वाधिक गुणवत्ता शिष्यवृत्ती प्राप्त करणाऱ्या अधिविभागांचे प्रमुख आणि महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार गुरुवारी कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते करण्यात आला. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यावेळी प्रमुख उपस्थित होत्या.



शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती प्राप्त करणाऱ्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या सत्कार प्रसंगी कुलगुरू डॉ. रजनीश कामत, डॉ. ज्योती जाधव, डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव आदी.

पदव्युत्तर प्रवेश विभागामार्फत राबविण्यात आलेल्या या योजनेसाठी यंदा १,१३८ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी विविध घटकांतील पात्र विद्यार्थ्यांची निवड करून शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली. योजनेसाठी ४१० विद्यार्थी पात्र ठरले. यात विद्यार्थिनींची संख्या ३५६ इतकी आहे. यावेळी कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेमुळे ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळत आहे. गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवासात आर्थिक बळ देण्याबरोबरच महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी ही योजना महत्त्वपूर्ण ठरली आहे. आज उपस्थित महाविद्यालयांनी आपली गुणवत्तेची परंपरा कायम राखण्याबरोबरच इतर महाविद्यालयांनाही या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन त्यांनी केले.

**विविध घटकांना शिष्यवृत्तीचे वितरण**

सर्वसाधारण घटकातून सर्वाधिक २९२ विद्यार्थी पात्र ठरले. त्यामध्ये २४३ विद्यार्थ्यांना पदवी शिष्यवृत्ती आणि ४९ विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली. या घटकांसाठी १७.०५ लाख रुपये वितरित करण्यात आले.

आर्थिक दुर्बल घटकातून ५६ विद्यार्थी, निराधार घटकातून ४३ विद्यार्थी, दिव्यांग घटकातून ८ विद्यार्थी, तर क्रीडा घटकातून ११ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या सर्व घटकांसह एकूण शिष्यवृत्ती रक्कम २९.५५ लाख रुपये इतकी वितरित करण्यात आली.

यावेळी कुलगुरू डॉ. कामत यांच्या हस्ते या महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये डॉ. एस. एस. कदम, डॉ. एस.एच. सावंत, डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. एस.एल. कदम, डॉ. एस.एम. पाटील, डॉ. राजाराम पाटील, डॉ. आर.जी. कुलकर्णी, डॉ. डी.एम. पाटील यांचा समावेश होता.

कार्यक्रमाला परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. अजय साळी यांच्यासह महाविद्यालयांचे शिक्षक व अधिकारी उपस्थित होते. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. उपकुलसचिव तेजस्विनी भूतकर यांनी आभार मानले.

19 JUN 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ४१० गुणवंत विद्यार्थ्यांना २९ लाखांची शिष्यवृत्ती

## शिवाजी विद्यापीठाकडून शिक्षणाला पाठबळ; महाविद्यालयांचा गौरव

कोल्हापूर, ता. १८ : शैक्षणिक गुणवत्ता आणि स्पर्धात्मकता वाढविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या 'शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती' योजनेंतर्गत २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी एकूण ४१० विद्यार्थ्यांची निवड केली. त्यांना २९ लाख ५५ हजार रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान केली.

यामधील सर्वाधिक गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळवणाऱ्या अधिविभागांचे प्रमुख आणि महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते आज झाला. त्यामध्ये डॉ. एस. एस. कदम, एस. एच. सावंत, व्ही. एम. पाटील, एस. एल. कदम, एस. एम. पाटील, राजाराम पाटील, आर. जी. कुलकर्णी, डी. एम. पाटील यांचा समावेश होता.

### सर्वाधिक गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळविणारी महाविद्यालये

■ शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग (शिष्यवृत्ती मिळविणारे विद्यार्थी - ११), शिवराज कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँड डी. एस. कदम सायन्स कॉलेज, गडहिंग्लज (१३), अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ फार्मसी, आष्टा (१३), संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, महागाव (१२), न्यू कॉलेज (११), डी. आर. माने महाविद्यालय, कागल (११), भोगावती महाविद्यालय, कुरूकली (५), पद्मभूषण डॉ. क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी आर्टस् कॉलेज, झरे (१०), कॉलेज ऑफ नॉन कन्व्हेन्शनल व्होकेशनल कोर्स फॉर विमेन, कोल्हापूर (६), संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव (९).



पदव्युत्तर प्रवेश विभागामार्फत राबवलेल्या या योजनेसाठी यंदा १,१३८ अर्ज आले होते. त्यातून शिष्यवृत्तीसाठी ४१० विद्यार्थी पात्र ठरले. त्यात विद्यार्थिनींची संख्या ३५६ आहे. परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, महादेव देशमुख, वर्षा मैंदर्गी, अजय साळी उपस्थित होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी स्वागत केले. अभिजित लिंग्रस यांनी सूत्रसंचालन केले. उपकुलसचिव तेजस्विनी भूतकर यांनी आभार मानले.

> विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेमुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळत आहे.
> **- डॉ. आर. के. कामत**, कुलगुरू

| घटकनिहाय पात्र विद्यार्थी | |
|---|---|
| सर्वसाधारण | २९२ |
| आर्थिक दुर्बल | ५६ |
| निराधार | ४३ |
| दिव्यांग | ८ |
| क्रीडा | ११ |

नवराष्ट्र
Kolhapur | 19 June 2026 | Page 2



# शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती जाहीर

## ४१० विद्यार्थ्यांना २९.५५ लाखांचे वितरण; निवड झालेल्यांमध्ये ८६ टक्के विद्यार्थिनी

▶ कोल्हापूर, (वा.) शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे आणि गुणवत्तेमधील स्पर्धात्मकतेला चालना देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या 'शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती' योजनेअंतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी एकूण ४१० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या पात्र विद्यार्थ्यांना एकूण २९ लाख ५५ हजार रुपयांच्या शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आले आहे. या योजनेत यंदा तब्बल ३५६ विद्यार्थिनींनी बाजी मारली असून एकूण लाभार्थ्यांमध्ये त्यांचे प्रमाण ८६ टक्क्यांहून अधिक आहे.

या योजनेंतर्गत विद्याशाखानिहाय सर्वाधिक गुणवत्ता शिष्यवृत्ती प्राप्त करणाऱ्या अधिविभागांचे प्रमुख आणि महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते करण्यात आला. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.



### ग्रामीण भागातील उच्च शिक्षणाला आर्थिक बळ

पदव्युत्तर प्रवेश विभागामार्फत राबविण्यात आलेल्या या योजनेसाठी यंदा विद्यापीठाकडे १,१३८ अर्ज प्राप्त झाले होते. छाननीअंती विविध सामाजिक व आर्थिक घटकांतील पात्र ४१० विद्यार्थ्यांची या योजनेसाठी निवड झाली. विद्यापीठाच्या या महत्त्वाकांक्षी योजनेमुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी थेट आर्थिक बळ मिळत आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. कामत यांनी यावेळी केले. सन्मानित महाविद्यालयांनी आपली गुणवत्तेची परंपरा कायम राखत इतर संस्थांनाही या योजनेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

### कुलगुरूंच्या हस्ते प्राचार्यांचा गौरव व मान्यवरांची उपस्थिती

गुणवत्ता शिष्यवृत्तीत आघाडी घेतलेल्या महाविद्यालयांचे प्राचार्य अनुक्रमे डॉ. एस. एस. कदम, डॉ. एस.एच. सावंत, डॉ. व्ही.एम. पाटील, डॉ. एस.एल. कदम, डॉ. एस.एम. पाटील, डॉ. राजाराम पाटील, डॉ. आर.जी. कुलकर्णी व डॉ. डी.एम. पाटील यांचा कुलगुरूंच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. अजय साळी यांच्यासह विद्यापीठाचे अधिकारी व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले, तर उपकुलसचिव तेजस्विनी भूतकर यांनी आभार मानले.

### विद्याशाखा व गटनिहाय अव्वल ठरलेली महाविद्यालये अशी...

(कंसात शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांची संख्या)

**विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा:** शहरी गट: तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (११)
निमशहरी गट: शिवराज कॉलेज, गडहिंग्लज (१३) आणि अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ फार्मसी, आष्टा (१३)
ग्रामीण गट: संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, महागाव-गडहिंग्लज (१२)

**वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा:** शहरी गट: द न्यू कॉलेज, कोल्हापूर (९)
निमशहरी गट: डी. आर. माने महाविद्यालय, कागल (११)
ग्रामीण गट: भोगावती महाविद्यालय, कुरूकली (५)

**मानवविज्ञान विद्याशाखा:** शहरी गट: द न्यू कॉलेज, कोल्हापूर (१०)
निमशहरी गट: डी. आर. माने महाविद्यालय, कागल (८)
ग्रामीण गट: पद्मभूषण डॉ. क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी आर्ट्स कॉलेज, झरे (१०)

**आंतरविद्याशाखीय विद्याशाखा:** शहरी गट: कॉलेज ऑफ नॉन कन्व्हेन्शनल व्होकेशनल कोर्स फॉर विमेन, कोल्हापूर (६)
निमशहरी गट: संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव (९)
ग्रामीण गट: निरंक

### सर्वसाधारण घटकांतून सर्वाधिक २९२ विद्यार्थी ठरले पात्र

शिष्यवृत्तीच्या एकूण २९.५५ लाख रुपयांच्या निधीचे विविध घटकांतर्गत वर्गीकरण करण्यात आले आहे. यामध्ये सर्वाधिक १७.०५ लाखांचा निधी सर्वसाधारण घटकातील २९२ विद्यार्थ्यांना मंजूर झाला; ज्यामध्ये २४३ पदवी, तर ४९ पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा समावेश आहे. आर्थिक दुर्बल घटकातून ५६, निराधार घटकातून ४३, क्रीडा घटकातून ११, तर दिव्यांग घटकातून ८ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आली आहे.

1 9 JUN 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डी. आर. माने महाविद्यालयाचा गुणवत्ता शिष्यवृत्तीत निमशहरी गटात प्रथम क्रमांक

**कागल :** दि कागल एज्युकेशन सोसायटी संचालित डी. आर. माने महाविद्यालय, कागल यांनी शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखत आणखी एक मानाचा टप्पा गाठला आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेत मानवविज्ञान विद्याशाखेच्या निमशहरी गटातून महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे हा बहुमान महाविद्यालयाने सलग पाचव्या वर्षी मिळवून उल्लेखनीय कामगिरीची नोंद केली आहे.



**कागल : डी. आर. माने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार कदम यांचा सन्मान करताना कुलगुरू रजनीश कामत. सोबत इतर मान्यवर.**

या यशाबद्दल गुरुवार, दि. १८ जून रोजी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील व्यवस्थापन सभागृहात कुलगुरू रजनीश कामत यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित गुणगौरव समारंभात महाविद्यालयाचा सन्मान करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार कदम, कार्यालयीन अधीक्षक बाबूराव पुंडे, प्रा. सचिन कांबळे, प्रा. विजय कांबळे तसेच प्रशासकीय कर्मचारी सुधीर कदम उपस्थित होते.

या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, सर्व स्तरांतून संस्थेचे अभिनंदन होत आहे. या यशामागे परिसर संचालक डॉ. प्रवीण चौगले, प्राचार्य डॉ. नंदकुमार कदम आणि शिष्यवृत्ती विभागप्रमुख प्रा. सचिन कांबळे यांचे विशेष योगदान आणि परिश्रम लाभले आहे. तसेच दि कागल एज्युकेशन सोसायटीचे सचिव प्रताप ऊर्फ भैया माने, उपाध्यक्ष सुनील माने आणि संचालक प्रा. बिपीन माने यांचे मोलाचे मार्गदर्शनही लाभल्याचे महाविद्यालयाच्या वतीने सांगण्यात आले.

# राजर्षी शाहू संशोधन केंद्राच्या प्रभारी संचालकपदी डॉ. मंजुश्री पवार



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन केंद्राच्या प्रभारी संचालकपदी इतिहास संशोधक डॉ. मंजुश्री पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते डॉ. पवार यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. अरुंधती पवार, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे उपस्थित होते. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी राजर्षी शाहू महाराजांचे विचार, कार्य आणि इतिहास यांचा सखोल अभ्यास व संशोधन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUN 2026
पुढारी

# राजर्षी शाहू संशोधन केंद्राच्या प्रभारी संचालकपदी डॉ. मंजुश्री पवार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन केंद्राच्या प्रभारी



संचालकपदी इतिहास संशोधक डॉ. मंजुश्री पवार यांची नियुक्ती करण्यात आली. कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते त्यांना नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले. ज्येष्ठ इतिहास संशोधक व केंद्राचे माजी मानद संचालक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या त्या कन्या आहेत.

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी राजर्षी शाहू महाराजांचे विचार, कार्य आणि इतिहास यांचा सखोल अभ्यास व संशोधन केले. त्या कार्याचा वारसा रक्तातच असल्याने डॉ. मंजुश्री पवार या पदाला निश्चितपणे न्याय देतील, असा विश्वास कुलगुरू डॉ. कामत यांनी याप्रसंगी व्यक्त केला. डॉ. पवार यांचा राजर्षी शाहू महाराज यांच्याविषयीचे संशोधन, इतिहास व सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा वारसा जपण्याचा प्रयत्न निश्चितपणे करेन, अशी ग्वाही डॉ. मंजुश्री पवार यांनी दिली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. अरुंधती पवार, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे उपस्थित होते.

19 JUN 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ तलाव ठरणार 'जीवनदायिनी'

## टंचाईच्या काळात महापालिकेच्या ४० टँकरद्वारे शहराला पाणीपुरवठ्याची तयारी

**महापालिकेतून...**

### खासगी विहिरी, बोअरही मनपा घेणार...

शहरातील पाण्याची परिस्थिती नियंत्रणात राहावी, यासाठी महापालिका अन्य पर्यायी स्रोतांचाही शोध घेत आहे. मात्र, अत्यावश्यक परिस्थितीत शिवाजी विद्यापीठाचा तलाव हा विश्वासार्ह जलस्रोत म्हणून उपलब्ध राहणार असल्याने प्रशासनाला मोठा आधार मिळाला आहे. त्याबरोबरच खासगी विहिरी, व्यावसायिक बोअरमधूनही महापालिका पाणी घेण्याची तयारी करत आहे.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर शहरावर संभाव्य पाणीटंचाईचे संकट ओढवल्यास शिवाजी विद्यापीठाच्या तलावातील पाणी उपलब्ध करून देण्याची तयारी महापालिकेने सुरू केली आहे. त्यासाठी ४० मोठे टँकर भाड्याने घेणार असून त्यातून विविध भागांत पाणीपुरवठा केला जाणार आहे. हा तलाव शहरवासीयांसाठी 'जीवनदायिनी' ठरणार आहे.

या तलावाची साठवण क्षमता २८ कोटी लिटर आहे. यावर्षी पावसाचे प्रमाण आणि पाण्याची उपलब्धता याचा विचार करता, सध्या तलावात अंदाजे ६० लाख लिटर साठा शिल्लक आहे. हा साठा विद्यापीठाच्या गरजा लक्षात घेऊन राखून ठेवला असला, तरी शहरात गंभीर पाणीटंचाई निर्माण झाल्यास हे पाणी नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक भूमिका घेतली जाईल.

महापालिका प्रशासनानेही शहरातील विविध भागांमध्ये जलदगतीने पाणी पोहोचवण्यासाठी ४० मोठे टँकर घेण्याची तयारी केली आहे. पाणीपुरवठा विस्कळीत झालेल्या किंवा कमी दाबाने पाणी मिळणाऱ्या परिसरांना टँकरद्वारे प्राधान्याने पाणी दिले जाईल. विद्यापीठ आणि महापालिका यांच्यातील समन्वयामुळे सार्वजनिक संस्थांनी सामाजिक जबाबदारीची जपलेली भावना पुन्हा एकदा अधोरेखित होत आहे. विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात आलेला तलाव आता गरज पडल्यास लाखो शहरवासीयांच्या मदतीला धावून येणार आहे. जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर ही बाब महत्त्वाची ठरणार आहे.

**विद्यापीठाच्या जलसुरक्षेचा आधार**

शिवाजी विद्यापीठाने सन २००० मध्ये परिसरातील पाण्याची गरज भागविण्यासाठी हा तलाव बांधला आहे. शैक्षणिक विभाग, प्रशासकीय इमारती तसेच वसतिगृहांमध्ये राहणारे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांच्यासाठी वर्षभर पाण्याची उपलब्धता राहावी, या उद्देशाने हा प्रकल्प साकारण्यात आला होता. कालांतराने हा तलाव विद्यापीठाच्या जलसुरक्षेचा आधार बनला.

19 JUN 2026

सकाळ

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पन्हाळ्याचा इतिहास प्रभावीपणे अनुभवता येणार

## डॉ. अभिजित आंबेकर : 'डिजिटल हेरिटेज ऑडिओ गाईड टूर' उपक्रमाचा प्रारंभ

पन्हाळा, ता. १८ : पन्हाळा किल्ला हा आपल्या गौरवशाली इतिहासाचा आणि सांस्कृतिक वारशाचा अमूल्य ठेवा आहे. या ऑडिओ गाईडच्या माध्यमातून पर्यटकांना किल्ल्याचा इतिहास, वास्तूंचे महत्त्व आणि माहिती अधिक प्रभावीपणे अनुभवता येणार आहे, असे प्रतिपादन मुंबई मंडळाचे अधीक्षक डॉ. अभिजित एस. आंबेकर यांनी केले. पन्हाळा किल्ल्यावर आयोजित 'डिजिटल हेरिटेज ऑडिओ गाईड टूर' या नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



पन्हाळा : डिजिटल हेरिटेज ऑडिओ गाईड उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवर.

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, मुंबई मंडळाच्यावतीने पन्हाळा किल्ल्यावर पर्यटकांचा सहभाग वाढविण्यासाठी आणि स्मारकाची परिपूर्ण ऐतिहासिक माहिती देण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. याचे उद्घाटन डॉ. सचिन पाटील, डॉ. आंबेकर आणि डॉ. नीलांबरी जगताप यांच्या हस्ते झाले.

या योजनेची वैशिष्ट्ये डॉ. सचिन पाटील व डॉ. नीलांबरी जगताप यांनी सांगितली. या सोहळ्याला डॉ. ए. व्ही. नागनूर, एम. आर. शेख, बाबासाहेब जंगले, नागरिक उपस्थित होते.

### भविष्यात सांकेतिक भाषेत व्हिडिओ

**■ भविष्यात सुलभता वाढविण्यासाठी, श्रवणदोष असलेल्या पर्यटकांसाठी सांकेतिक भाषेतील व्हिडिओ विकसित करण्याचे कामही हाती घेण्यात आले आहे. हे व्हिडिओ नजीकच्या काळात ऑनलाईन सुरू करण्याचा प्रस्ताव आहे, असेही यावेळी सांगण्यात आले.**

19 JUN 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पन्हाळगडावर आता डिजिटल ऑडिओ टूर गाईड सेवा

## भारतीय पुरातत्व विभागाचा अभिनव उपक्रम : ऐतिहासिक वास्तूंची इंग्रजी, मराठी, हिंदीमधून मिळणार मोबाईलवर माहिती

**जनप्रवास : राजू मुजावर**

ऐतिहासिक किल्ले पन्हाळगडावर आता पर्यटकांना डिजिटल हेरिटेज ऑडिओ गाईड टूर योजना कार्यान्वित करण्यात आली. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मुंबई मंडळाच्या वतीने गुरुवारी सायंकाळी सहा वाजता डिजिटल टूर गाईड योजनेद्वारे ऐतिहासिक वारसा स्थळावरील पर्यटक सहभाग वाढवण्यासाठी ही योजना कार्यान्वित केल्याचे भारतीय पुरातत्व विभागाचे मुंबई विभागाचे अधीक्षक डॉ. अभिजित आंबेकर यांनी सांगितले.

पन्हाळा किल्ल्यावरील या अभिनव ऑडिओ गाईड टूर योजनेची सुरुवात इतिहास संशोधक डॉ. सचिन पाटील यांच्या हस्ते व व्ही. एस. खांडेकर मेमोरियल म्युझियमच्या संचालक डॉ.



**पन्हाळा : पन्हाळा डिजिटल ऑडिओ टूर गाईडचे उद्घाटन करताना डॉ.सचिन पाटील, डॉ. अभिजित आंबेकर, डॉ. निलांबरी जगताप आदी.**

निलांबरी जगताप यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये झाली.

पन्हाळा किल्ल्यावर आल्यानंतर आता येथील १८ ऐतिहासिक ठिकाणांवर पर्यटक म्हणून गेल्यानंतर या ठिकाणी असलेल्या ऐतिहासिक वास्तूंची इंग्रजी, मराठी, हिंदी मधून संपूर्ण माहिती आता आपल्या मोबाईलद्वारे पर्यटकांना ऐकता येणार आहे. आणि कोणाच्याही मदती शिवाय पर्यटक स्वतः ऐतिहासिक वारसा स्थळाची पाहणी करत माहिती ऐकणार आहेत. ही योजना लोकेशन बेस्ड ट्रीग्रिंग तंत्रज्ञान विकसित करून बनवली असल्याने ठराविक वेळी वारसास्थळी पोहोचल्या नंतर आपोआपच या ठिकाणची माहिती मोबाईल स्पीकर मधून ऐकायला येणार आहे. अगदी नेटवर्क उपलब्ध नसलेल्या ठिकाणी सुद्धा ऑफलाइन सुविधा देखील असणार आहे. त्यामुळे पर्यटकांना ऐतिहासिक माहिती मिळवण्याचा स्तोत्र उपलब्ध झाला आहे.

▶ पान ४ वर

# पन्हाळगडावर आता डिजिटल ऑडिओ टूर गाईड सेवा

▶ पान १ वरून : ऐतिहासिक वारसा स्थळांचा जनसंपर्क वाढवण्यासाठी तसेच डिजिटल तंत्रज्ञानचा वापर करण्यासाठी भारतीय पुरातत्व विभागाचा हा व्यापक प्रयत्न असून श्रवणदोष असलेल्या पर्यटकांसाठी संकेत भाषा व्हिडीओ विकसित करण्याचे काम देखील सुरू असल्याचे डॉ. अभिजीत आंबेकर यांनी सांगितले. कोल्हापूर जिल्ह्यातील खिद्रापूर येथील कोपेश्वर मंदिर व पन्हाळा किल्ला येथे ही खास योजना सुरू झाल्याने भारताचा सांस्कृतिक वारसा पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी व आकर्षक व अर्थपूर्ण बनवण्यासाठी महत्त्वाचे पाऊल आहे. यामुळे ऐतिहासिक वारसास्थळ असलेल्या पन्हाळगडाचे वास्तुशिल्पीय व कलात्मक महत्त्व पर्यटक, अभ्यासक यांना प्रोत्साहन ठरणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन भारतीय पुरातत्व विभाग कोल्हापूर परिमंडलचे सर्वेक्षण सहायक बाबासाहेब जंगले, तसेच रक्षक आशपक गारदी यांनी केले होते. कार्यक्रमास डॉ. ए.व्ही. नागणूर, पुरातत्त्व अभियंता एम. आर. शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

19 JUN 2026 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या १९ विद्यार्थ्यांचे स्पर्धा परीक्षेत यश

**त. भा. प्रतिनिधी**



सुहेल मुल्ला, धनाजी शेळके, अतुल मानकर, कल्पक चिले, सूरज कांबळे, महेश साळुंखे, नितीन वळवी, प्राजक्ता पाटील, कुणाल दैव, दिनेश साबळे, पंकज पाटील, पंकज खंबाईत, राकेश लोहार, रोहित पाटील, सुनिल कांबळे, शिवराज पाटील, ओंकार रणदिवे, अनिल टेंगले

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातील १९ विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगासह सरळसेवा भरतीच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षांमध्ये यश प्राप्त केले आहे. पोलीस उपनिरीक्षक पदापासून ते आरोग्य सेवकापर्यंतची पदे या विद्यार्थ्यांनी मिळविली आहेत, अशी माहिती केंद्राच्या समन्वयक डॉ. कविता वड्राळे यांनी दिली.



संदेश साठे

महाराष्ट्र लोकसेवा आयोगासह विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे : धनाजी शेळके (पोलीस उपनिरीक्षक), महेश साळुंखे (पोलीस उपनिरीक्षक), अतुल मानकर (राज्य कर निरीक्षक), सुहेल मुल्ला (कर सहाय्यक), कल्पक चिले, (कर सहाय्यक), सुरज कांबळे, (तीन पदे महसूल सहाय्यक, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली, कालवा निरीक्षक, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, आरोग्य सेवक, आरोग्य विभाग), पंकज पाटील (तीन पदे ज्युनिअर असिस्टंट, जिल्हा परिषद, पुणे, वरिष्ठ सुरक्षा सहाय्यक, आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, आरोग्य सेवक, जिल्हा परिषद, सातारा), दिनेश साबळे (चार पदे सिव्हील इंजिनियर असिस्टंट, जलसंपदा विभाग, सातारा, नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका, सिव्हील इंजिनियर असिस्टंट, पाटबंधारे विभाग, ज्युनियर इंजिनियर, जिल्हा परिषद, कोल्हापूर) कुणाल दैव (तलाठी, सांगली), सुनिल कांबळे, (कालवा निरीक्षक, जलसंपदा विभाग, पवित्र पोर्टल, शिक्षक), प्राजक्ता पाटील (मोजणीदार, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन), रोहित पाटील (रेल्वे बोर्ड, ट्रॅक मेन्टेनर), पंकज खंबाईत (तलाठी, नाशिक), शिवराज पाटील (कार्यकारी सहाय्यक, मुंबई महानगरपालिका), ओंकार रणदिवे (फायर ब्रिगेड, मुंबई महानगरपालिका), नितीन वळवी, (लॅब अटेंडंन्ट, गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज), राकेश लोहार, (लॅब अटेंडन्ट, गर्व्हमेंट मेडिकल कॉलेज), अनिल टेंगले, (आरोग्य सेवक, आरोग्य विभाग), संदेश साठे (पवित्र पोर्टल, प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद, सातारा).

या सर्व विद्यार्थ्यांना विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी त्यांचे कौतुक केले. दरम्यान, सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेला सुरूवात झाली असून ३० जूनपर्यंत प्रवेश अर्ज सादर करण्याचे आवाहन डॉ. वड्राळे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUN 2026
सकाळ

# आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी डॉ. लंगरे यांची निवड



डॉ. चंद्रकांत लंगरे

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील इंग्रजी अधिविभागाचे माजी प्रमुख डॉ. चंद्रकांत लंगरे यांची लंडन येथील जोसेफ कॉनरॅड सोसायटी येथे एक ते तीन जुलैदरम्यान होणाऱ्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी निवड झाली. ते 'द सिनेमॅटिक कॉनरॅड : जोसेफ कॉनरॅड'स व्हिक्टरी इन फिल्म अडॅप्टेशन' शोधनिबंध सादर करणार आहेत. डॉ. लंगरे यांनी जगप्रसिद्ध कादंबरीकार जोसेफ यांच्या कादंबरीवर पीएच.डी.चे संशोधन केले. तसेच या लेखकाच्या साहित्यकृतीवर त्यांनी यापूर्वी इटली, इंग्लंड, पोलंडमधील विद्यापीठांत आयोजित आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात शोधनिबंध सादर केले आहेत. त्यांनी जोसेफ यांच्या शंभराव्या पुण्यतिथीनिमित्त अमेरिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ नॉर्थ टेक्सास येथील लेखक, समीक्षक प्रा. जॉन पिटर्स यांच्याबरोबर जोसेफ यांच्या साहित्यकृतीवर दोन वैश्विक ग्रंथांचे कॉनरॅड सोसायटी लंडन यांच्या सहकायाने संपादन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 9 JUN 2026
पुढारी

# 'दूरशिक्षण'च्या प्रवेशास १० जुलैपर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीच्या विविध पदवी, पदव्युत्तर व ऑनलाईन अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस १० जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास), एम.कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) या दूरशिक्षण अभ्यासक्रमांसह ऑनलाईन एम.बी.ए., एम.कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरू आहेत. केंद्राच्या ८९ अभ्यास केंद्रांमार्फत विद्यार्थ्यांना प्रवेशाची सुविधा उपलब्ध आहे. विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रवेशासंदर्भातील माहिती उपलब्ध आहे. तसेच, विद्यार्थी ऑनलाईन प्रवेश पोर्टलवर जाऊन प्रवेश निश्चित करू शकतात.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUN 2026
पुढारी

# बी.एस्सी.-बी.एड. प्रवेशासाठी उद्यापर्यंत नोंदणीची मुदत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने बी.एस्सी.-बी.एड. प्रवेशासाठी शनिवार (दि. २०) पर्यंत नोंदणीची मुदत आहे. शिक्षणशास्त्र अधिविभागातील बी.एस्सी.-बी.एड. (आयटीईपी) अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी 'एनसीईटी-२०२६' परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचे प्री-रजिस्ट्रेशन सुरू आहे. प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहिती व नोंदणीसाठी शिक्षणशास्त्र अधिविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन अभ्यासक्रम समन्वयक डॉ. रूपाली संकपाळ व अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUN 2026

जनप्रवास

# विद्यापीठ परीक्षा: ७४४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल - २०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. १ एप्रिलपासून व्यवस्थितपणे सुरु झालेल्या आहेत. आज दि. १८ जूनरोजी विविध २६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ५९ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी ३१६७ विद्यार्थी उपस्थित होते. गुरुवारी १८ जूनरोजी विविध ६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आलेले असून आजअखेर ७४४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आलेले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 9 JUN 2026
तरूण भारत

# पदवी, पदव्युत्तरच्या ७४४ अभ्यासक्रमांचे निकाल

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील गुरूवार दि.१८ रोजी ६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले असून आजअखेर ७४४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. गुरूवारी विविध २६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ५९ परीक्षा केंद्रावर पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी ३१५७ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आलेली नाही.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUN 2026
पुढारी

# विद्यापीठाकडून ७४४ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील आजअखेर ७४४ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. गुरुवारी बीए, बी.कॉम., बीएस्सी., एमए, एमबीए, एम.फार्मसी., बी.फार्मसी., फार्मा डी. बॅचलर ऑफ लॉ आदी २६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा ५९ केंद्रांवर झाल्या. परीक्षेला ३ हजार १५७ विद्यार्थी उपस्थित होते. दि. १८ रोजी बीएस्सी, एम.एस्सी. (अर्थशास्त्र), बीसीए आदी अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.